दिगंबर राय

साने गुरुजी

साने गुरुजी जन्मशताब्दी अभियान माला

दिगंबरराय

साने गुरुजी

साधना प्रकाशन

४३१ शनिवार पेठ, पुणे ३०

© साधना ट्रस्ट

आठवी आवृत्ती : १९९८
साने गुरुजी जन्मशताब्दी वर्षारंभ
२४ डिसेंबर १९९८

प्रकाशक आणि मुद्रक
ग. प्र. प्रधान
साधना प्रकाशन व साधना प्रेस
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

किंमत : १५ रुपये

साने गुरुजींच्या निर्वाणानंतर विनोबाजींनी त्यांच्याविषयी अतिशय उमाळ्याने लिहिले. 'अमृताचा पुत्र' या शब्दांत त्यांनी त्यांचे वर्णन केले. त्यात त्यांनी म्हटले आहे, "साहित्य तर त्यांनी अपरंपार लिहून ठेवले आहे... लिहिल्याशिवाय, बोलल्याशिवाय राहवत नसे म्हणून ते लिहीत आणि बोलत. दीनांचा कळवळा त्यांच्याकडून साहित्य वदवीत होता."

साने गुरुजींच्या या अपरंपार साहित्यापैकी शंभर-एक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. जे प्रसिद्ध झाले त्याहून किती तरी जास्त अद्याप ग्रंथनिविष्ट झालेले नाही.

'दिगंवर राय' हे असेच एक विस्मृत हस्तलिखित. अव्वल इंग्रजी अंमलातील परिस्थितीचे उत्कट चित्रण या लघुकादंबरीत केलेले आहे. दिगंबर राय, स्नेहमयी आणि राखाल हे सर्वच चटका लावून जातात.

भ्रष्ट सार्वजनिक जीवनाच्या उतरंडीवर घसरणाऱ्या समाजाला सावरण्याला उद्याच्या पिढ्या समर्थ व्हायच्या तर समाजाचा असा उत्कट कळवळा दाखवणारे चारित्र्य राष्ट्रात निर्माण झाले पाहिजे.

साने गुरुजींच्या इतर साहित्याप्रमाणे ही लघुकादंबरी कुमारांना आवडो.

प्रकाशक

१ : राखालची तळमळ

इंग्रज आता जवळजवळ सर्व हिंदुस्थानचे स्वामी झाले होते. अजून सारा पंजाब त्यांनी ताब्यात घेतला नव्हता. तो डलहौसीस शेवटचा घास राखून ठेवण्यात आला होता. एखाद्या भागाचा भौगोलिक कब्जा घेताच तेथील आर्थिक कब्जाही इंग्रज घेत. तेथील उद्योगधंदे मारण्याला ते उशीर लावीत नसत. इंग्लंडमध्ये भराभरा गिरण्या वाढू लागल्या होत्या. कारण हिंदुस्थान ही नवीन पेठ त्यांना मिळाली होती. परंतु इंग्लंडमधल्या यांत्रिक युक्तीने भराभरा निघणारा माल हिंदुस्थानात खपणार कसा? हिंदुस्थानातील घरोघरच्या मिल्स जोपर्यंत सुरू होत्या, तोपर्यंत हा माल खपणार कसा? हिंदुस्थानातील खेड्यापाड्यांतून माग पसरलेले आहेत, तोपर्यंत इंग्रजांचा माल घेणार कोण?

हिंदुस्थानातील व्यापाऱ्यांची, हिंदी कारागिरांनी विणलेली रेशमी वस्त्रे, तलम मलमली यांनी भरलेली गलबते पूर्वी युरोपला जात असत. इंग्लिश खाडीतून जात असत, फिरत असत. परंतु इंग्रजांनी या गोष्टीला कायद्याने बंदी केली. हिंदी व्यापाऱ्यांची शेकडो गलबते घरी बसली, तो उद्योगधंदा इंग्रजांनी मारला; व्यापारी वाहतूक सारी आपल्या हातात त्यांनी घेतली. इंग्लंडमध्ये तरीही हिंदुस्थानातील माल खपे! परंतु हिंदुस्थानातील भारी जकाती देऊनही स्वस्त पडणारा माल जर इंग्लंडमध्ये कोणी वापरील तर त्याला कायद्याने शिक्षा ठरवली गेली. हिंदुस्थानातले वस्त्र वापरणे हा इंग्लंडमध्ये फौजदारी गुन्हा ठरला! इंग्लंडमध्ये हिंदी कपडा बंद झाला, युरोपमध्येही बंद झाला. कारण इंग्रज कंपन्या माल नेतनाशाच झाल्या. हिंदी गलबते नाहीशी झाली.

हिंदुस्थानात मात्र अजून हिंदी माल खपत होता; तो कसा नाहीसा करावा, हिंदी लोकांच्या घरीही इंग्रजी माल, इंग्रजी कपडा कसा भरावा, याचा दयाळू, व मायाळू इंग्रज विचार करू लागले! हिंदी स्त्रिया घरोघर सूत कातीत. या सुतावर इंग्रजाने कर घेण्याचे सुरू केले. त्यामुळे सूत विकत घेणाऱ्या विणकराला ते महाग पडू लागले. इंग्लंडमधून मिलमधले आयते सूत इकडे इंग्रज पाठवू लागला व ते बाजारात स्वस्त विकू लागला. विणकर लोक हे स्वस्त सूत विकत

घेऊ लागले व त्याचे कापड विणू लागले. परंतु मिलमध्येही जितके बारीक सूत निघत नाही, तितके बारीक सूत हिंदुस्थानातील वायका काढीत. २०० नंवरपर्यंत, त्याहून जास्त बारीक सूत येथील भगिनी काढीत. हिंदुस्थानातील राजेरजवाडे, श्रीमंत-जहागीरदार, धनिक लोक यांना या तलम सुताचे कपडे वापरण्याची सवय झालेली. त्यांना इंग्लंडमधल्या मिलचा कपडा आवडेना. विणकर महाग पडणारे– करामुळे जास्तच महाग पडणारे– हे तलम सूत खरेदी करीत. कारण देशात त्याला श्रीमंत गिऱ्हाइकी होती. तेव्हा इंग्रज याच्याही पुढे गेले. या विणकरांना आता नऊ नंबरापर्यंतच सूत विणण्याची परवानगी द्यावयाची, असे सरकारने मनात ठरवले. या कायद्याने, या एका दगडाने दोन पक्षी मारले गेले. तलम सूतही खप नसल्यामुळे कोणी काढीना; ते खपेना, विणकर विकत घेईना; विणकरालाही तलम कापड विणून जो जास्त पैसा मिळे तोही बंद झाला. सूत कातणारे भिकारी झाले, विणणारेही भिकारी झाले.

विणकरांना आता देशातील एक तर जाडेभरडे सूतच विणण्याची पाळी आली, नाही तर विलायती सूत वापरण्याची पाळी आली. विणकरांना वाईट वाटू लागले. कलावानांना वाईट वाटू लागले.

त्या एका कलावानाचे नाव राखाल होते. राखाल उत्कृष्ट विणकर होता. अत्यंत तलम सूत कसे हळुवार विणावे, हे त्याच्याच त्या सुकुमार बोटांना माहीत! एकेक पान विणायला त्याला महिना महिना लागे, दोन दोन महिने लागत! काय घाई आहे? उत्कृष्ट कला ही घाईने थोडीच निर्माण होत असते! एका वर्षात दोनचार पातळे तो विणी व वर्षाची पुंजी मिळवी; वर्षाची जीविका मिळवी.

परंतु आता त्याला जाडेभरडे सूत विणायची पाळी आली. त्याला वाईट वाटले. त्याच्या गावात विलायती सुताचे गठ्ठे येऊ लागले. ते पाहून त्याच्या डोळ्यांत अश्रू येत. कोठले हे सूत? साता समुद्रांपलीकडचे अमंगल सूत! कशाला येते हे आमच्या गावात? या हातांनी हे विणायचे का? ज्या हातांनी अत्यंत तलम कपडा विणला, त्याच हातांनी हे विणायचे का? या हातांचा हा अपमान आहे. माझ्यामधील कलेचा हा अपमान आहे. ज्या पूर्वजांनी मला ही दिव्य विणकला दिली, त्यांचा हा अपमान आहे. तो आपला माग पाही व रडे! मी विणले नाही तर ही विद्या मरून जाईल, सूत काढणाऱ्यांची विद्या जाईल, कलेची हानी होईल! छेः, त्याला ते सहन होईना.

बाजारात विदेशी कपडा सर्वत्र दिसू लागला. हिंदुस्थानातील तलम कपड्यांची सर त्याला येत नव्हती. हिंदुस्थानातील विणकर जोड कपडा विणीत

त्यात कलावानांचा आनंद असे, ते त्याचे अपत्य असे. त्यात त्याचे हृदय असे. त्याच्या हृदयाची सौम्यता, स्निग्धता, मातांच्या हृदयाची प्रेमळता त्या कपड्यात असे. यंत्रांनी निर्माण केलेल्या कपड्यात लवलवीतपणा दिसे. परंतु ती सुकुमारता नसे. आणि तितकी तलमता तर नव्हतीच. परंतु यंत्रांनी जरी कदाचित अत्यंत बारीक सूत कातले व विणले तरी हाताची सुभगता त्यात येत नसे. इतकी सुभगता हिंदी विणकराच्या हातात होती.

राखालच्या घरी खावयास काय? इतर विणकरी नवीन कपडा विणू लागले. पोट भरू लागले. खेड्यांतील बायका सूत घेऊन येत, तेही आता ते विकत घेत नसत. कोण जातो खेड्यात व घेतो विकत! हे आयतेच घ्या एकदम! पूर्वी विणकर खेड्यांत विकत घ्यावयास जाई, आता त्या आयाबहिणी त्यांच्याकडे येत. परंतु कोणी सूत घेईना! ते एक तर महाग पडे व सरकारी अंमलदारांचाही छळ! त्यांचे एजंट घरोघर सूत उधार देऊन जात, चटकन लावून जात! खेड्यांतील बाया रडत घरी जात! 'अरे देवा, आम्हांला बुडवणारे हे कोठले सूत, हे कोठले भूत, हाय रे देवा!' असे त्या म्हणत. घरचे चरखे पहात व रडत! ते पवित्र चरखे, काय करायचे त्यांचे! ते फेकणे म्हणजे पाप, जाळणे म्हणजे पाप! ते माळ्यावर जुन्या पोथ्या असत तसे ठेवण्यात आले.

राखालला त्या बाया परत जाऊ लागल्या म्हणजे वाईट वाटे. त्यांना बारीक सूत कातण्याची बंदी करण्यात आली होती, जो विणील त्यालाही बंदी! शिक्षा! कला जाणार,–जाणार! शेकडो वर्षांची, वेदकालापासूनची ही दिव्य अनादी कला जाणार काय, मरणार काय? राखालला वाईट वाटे.

खानदानीच्या दिलदार श्रीमंतांनाही वाईट वाटे. तो मिलचा कपडा घालणे त्यांना पाप वाटे. ते अजून विणकराजवळचा घेत. विणकर मिलच्याच सुताचा विणणार, परंतु त्यातल्या त्यांत बरा. साळवटी लुगडी, साळवटी धोतरे अजून खपत होती. अजून हिंदुस्थान निगरगट्ट झाला नव्हता. अजून श्रीमंत लोक खेड्यापाड्यांतून होते. ते शहरात बंगले बांधून मोटारी उडवू लागले नव्हते. अजून ते गायीगुरांत होते. अजून घरी गाईची खिल्लारे होती, वासरे अंगणात असत. तबेल्यात दिलदार घोडी असे! अजून शहरातील इंग्रजी शिक्षण फार बोकाळले नव्हते. इंग्रजीतील 'ही' म्हणजे 'तो' व 'शी' म्हणजे 'ती' व 'डॉग्' म्हणजे 'कुत्रा' हे शब्द घराबाहेर बसून पाठ करावे लागत, अपवित्र मानले जात!

राखाल हा उत्कृष्ट विणकर म्हणून प्रसिद्ध होता. त्याची कीर्ती आजूबाजूला पसरलेली होती. त्याचा नावलौकिक होता. श्रीमंतांच्या लग्नातून

वधूवरांना त्याच्या हातचेच कपडे यावयाचे. असा हा राखाल. आज त्याला खायला नव्हते. तरी तो अजून विलायती सूत, मिलचे सूत वापरावयास तयार नव्हता. देशी जाडेभरडे सूत त्याने विणले असते तर? परंतु त्याला तो कलेचा अपमान वाटे. ज्या बोटांनी आंब्याच्या कोयीत ठेवता येईल असा धोतरजोडा विणला व नवरदेवाला दिला, त्याच बोटांनी का सुताडे विणू? ज्या बोटांनी फुले वेचली त्या बोटांनी शेण कालवू? गुलाम होण्यापेक्षा माझे हात स्वतंत्र राहू दे. राखाल, कलापूजक राखाल उपाशी राहू लागला! कलेचा ऱ्हास स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्यापेक्षा मरण बरे. कलेची उपासना, ध्येयाची पूजा— आपल्या देवाची अर्चना व सेवा करता येत नसेल तर जीवनात काय राहिले? जीवनात ना राम, ना आराम. ना काम, ना विश्राम. ना सुख, ना आनंद. ते जीवन-भीषण नीरस जीवन— त्याहून मरण बरे!

२ : राजा दिगंबर राय

राखालच्या गावापासून काही अंतरावर एका गावात एक श्रीमंत जमीनदार राहात होते. राजा दिगंबर राय त्यांचे नाव. ते पन्नाशीच्या आतबाहेर होते. त्यांचे शरीर अद्याप चांगले तेजस्वी दिसे. अत्यंत धार्मिक म्हणून त्यांची ख्याती होती. कोणी वेद म्हणणारा आला, पंडित आला तर त्याला दिगंबर राय ठेवून घ्यावयाचे. त्याला शालजोडी नाहीतर चांगली दक्षिणा द्यावयाचे व म्हणायचे, "बारा बारा वर्षे श्रम करून तुम्ही वेद मुखोद्गत केला, परंतु आता समाजात कोण विचारतो? ही इंग्रजी येते आहे. तुम्हांला कोणी खायलाही देणार नाही. वेदांची पुस्तके छापतील. हल्ली छापतात पुस्तके. वेद घरोघर होईल. त्याची पूज्यता जाईल. त्याला भ्रष्ट करतील! वेदाच्या पोथीवर मग बसतील. वाटेल ते करतील. हे सारे भ्रष्टाचरण होण्यापूर्वी माझे डोळे मिटू दे म्हणजे झाले!" दुष्काळ पडला, पीक नीट आले नाही तर घरातील धान्य सारे वाटायचे व म्हणायचे कसे, "तुम्ही वाचलेत तर माझे पिकवाल! हे घरात भरून ठेवले होते ते तुमच्यासाठीच. घरच तुमचेच आहे!" सारा गाव त्यांच्यावर प्रसन्न असे. ते आपली चादर अंगावर घालून व जाड बांबूची काठी घेऊन शेतावर फिरायला निघाले की वाटेत सारे त्यांना नमस्कार करायचे. अनेकांची ते चौकशी करायचे. एका गरीब शेतकऱ्याच्या घरी एक मुलगा आजारी होता. दिगंबर रायांकडे औषधी संग्रह असे. पूर्वी खेड्यापाड्यांतून जे श्रीमंत असत त्यांच्या घरी औषधे

 / साने गुरुजी

असत. जणू गावातील मोफत दवाखानाच तो! कारण श्रीमंताने जरी पैसे देऊन औषधे विकत घेतली असली तरी गरिबाला तो फुकटच देई. गरिबाला विकून– जास्त किंमतीला विकून– पैसे घ्यावे ही हल्लीची धनिकविद्या. कृपणविद्या त्या काळी नीच मानली जाई. गरिबाला देणे, यातच कृतार्थता वाटे. आपल्या घरी आयत्या वेळी उपयोगी पडणारे औषध मिळाले, याचाच आनंद, तो सात्त्विक आनंद श्रीमंतांस होई. त्या आजारी मुलास पाहावयास दिगंबर राय त्याच्या झोपडीत गेले. त्याला पाहिले. ते म्हणाले, "बरा होईल. अशक्त आहे. मी औषध देईन ते नेत जा. रोज न्यायला यावे लागेल. सकाळ-संध्याकाळी दोनदा खेप करावी लागेल."

"महाराज, दहा वेळा येईन. परंतु पोरगा बरा होऊ दे. मला कामाला मदत करील. हल्ली बायकोला सूत वगैरेही काढून मदत करता येत नाही. सूत कोणी घेत नाही. आम्हीच बापलेक खपून काय दाणे आणू ते. पोटसुद्धा कधीकधी भरत नाही." तो शेतकरी म्हणाला.

"आजाराचे तेच कारण आहे. मी औषध देईन. होईल पंधरा दिवसांत बरा." असे म्हणून दिगंबर राय घरी गेले.

सायंकाळी तो शेतकरी आला. दिगंबर रायांनी वसंताची एक मात्रा त्याच्याजवळ दिली. म्हणाले, "ही मात्रा अर्धा शेर दुधात उगाळून दोन्ही वेळ देत जा."

"महाराज, मी गरीब, मजुरी करणारा. गाय ना बैल माझ्याजवळ. मी दूध कोठून आणू? ताकाचा थेंब नाही मिळत. दुसरे पाण्याबरोबर घ्यावयाचे औषध आहे का? मिठाबरोबरही नको. मीठही महाग केले ह्या नवीन सरकारने! नवीन राजा चांगला म्हणतात, पण आम्ही तर दादा मरणार सारे. कोणी श्रीमंत जगतील तर जगतील." शेतकरी म्हणाला.

"अरे, तुम्ही मेलेत तर आम्ही श्रीमंत तरी कसे जगणार? तुमच्यावर तर आमच्या उड्या. तुम्ही श्रमाल तेव्हा आमच्या पोटाच्या ढेरी खातील. तुमच्या अभावी ही आमची दोंदे खपणार कशी व खाणार काय? तुम्ही आमचे हातपाय! तुम्ही मेलेत म्हणजे आम्हीही मरू. तुम्हांला जगवले पाहिजे आम्ही. तुम्हांला जगवले नाही, तर त्यात आमचाही सर्वनाश. या खेड्यांची स्मशाने होतील बाबा." दिगंबर राय म्हणाले.

"मग कसे करू पोराचे?" शेतकरी करुण वाणीने म्हणाला.

"मी व्यवस्था केली आहे सारी. ही पाहिलीस? गाईच्या दुधाची अच्छेराची लोटी भरून आणली आहे. सकाळी पुन्हा ये. मीच माझ्या हाताने भरून देईन.

अलीकडे गडीमाणसांवरही भरंवसा नाही. लोक फसवाफसवी करायला लागले. पाणी घालून तुमचे दूध तोच प्यायचा! कलियुग म्हणतात ते परकीय राजाने आणले की काय कोणाला माहीत! सकाळी ये हो. आणि कधी कधी आमच्याकडून ताक वगैरे नेत जा. पुष्कळ असते. लौकर होईल बरा." दिगंबर राय म्हणाले.

"महाराज किती उपकार! कोठे फेडू?" शेतकरी म्हणाला.

"अरे, तुमचेच उपकार आम्ही कोठे फेडू! तुम्हा सर्वांचेच आम्हांवर उपकार आहेत. हे सारे वैभव तुमच्या श्रमांचे आहे. श्रीमंत मनुष्याने सर्वांना वाटण्यासाठीच जमवून ठेवावयाचे. हे धनधान्य, हे दूध-तूप, हे माझे नाही. ह्याची व्यवस्था लावणारा मी, वाटून– काला करणारा मी. पेंद्याला शक्ती यावी म्हणून जास्त द्यावे, दुसऱ्याला शक्ती आहे म्हणून जास्त द्यावे! हीच मजा! जा हो. सकाळी-सायंकाळी येत जा."

दिगंबर रायांनी त्याला निरोप दिला. दुसऱ्या दिवशी त्याच्या घरी धान्यही पाठवून दिले. त्या शेतकऱ्याची बायको दिगंबर रायांना शत धन्यवाद देऊ लागली. जगात दुःखी दुनियेने दिलेला दुवा– यापेक्षा श्रेष्ठतर काय आहे? धन्यतम काय आहे? आणि दुःखी दुनियेने दिलेला, तळमळून दिलेला शाप– याहून भयंकर दुसरे काय आहे?

दिगंबर रायांचा गावात तलाव होता. तो तलाव एका बाजूस जरा कोसळणार होता. साऱ्या गावाचा त्या तलावावर व्यवहार. गावाचा तो जीवनाधार. दिगंबर रायांनी ताबडतोब त्याची दुरुस्ती केली. असे हे दिगंबर राय होते. घरात मुलेबाळे होती. आनंद होता.

दिगंबर रायांना हे मिलच्या सुताचे कापड पटेना. आजपर्यंत ते तलम सुंदर कापड वापरीत आले. कोणी त्यांना सांगितले की मिलच्या सुताला खळ दिलेली असते. मिलच्या कपड्याला तकतकी असते. त्यात चरबी असते. गाईगुरांची चरबी असते! दिगंबर रायांच्या अंगावर शहाराच आला. गाई! पूज्य गोमाता. माझ्या कृष्णभगवानाच्या, गोपालकृष्णाच्या गाई, त्यांची चरबी! राम राम! आणि माझे लोक हा कपडा कसा अंगावर घालतात? हे रक्त, ही आग यांना अंगावर सहन होते? दिगंबर राय या कपड्यांचा विटाळही होऊन देत नसत.

त्यांचा मुलगा कलकत्त्याला गेला होता. शहरात येऊ लागलेला विलायती माल पाहून तो भुलला. तो चैनबाज बाबू विलायती माल घेऊन घरी आला. दिगंबर राय म्हणाले, "हे काय पाप आणलेस रे करंट्या?"

“बाबा, कसे मऊ तजेलदार कापड आहे! हल्ली ते जाडे कापड तुम्ही देता आम्हांला, ते नको.” त्यांचा मुलगा म्हणाला.

“अरे, ही तकतकी त्या गोमातेच्या रक्ताची आहे! अंगणात ठेवून त्याला आग लाव, आग! जाडेभरडे– अरे, तुझ्या आयाबहिणींनी काढलेले ते सूत. त्यांना बारीक काढू देत नाहीत. त्यांनी काढले तर कोणी विकत घेत नाही. विणायला या गो-घातक्यांनी कायद्याने बंदी केली. नाही तर आतापर्यंत आम्ही बारीकच कपडे नाही का वापरले? आता जाडे वापरा! जाडेभरडे! पण निर्मळ आहेत ते. तेच वापरा. ठेव ते अंगणाच्या बाहेर. ते देऊही नकोस कोणाला. विष आपणही खाऊ नये व देऊही नये कोणाला. रोगाचे जंतू मारूनच टाकावेत. गोवधाचे हे पाप– हे कसे कोणाला आपणहून द्यावयाचे? फुकट झाले– फुकट दिले म्हणून कोण पाप का घेईल? आणि कोण घेणारा निघाला तर आपण द्यावे का? लाव त्याला आग.”

दिगंबर रायांनी त्या विलायती वस्त्रांची होळी केली. हिंदुस्थानातील ती पहिली विलायती कापडाची झालेली पवित्र होळी! ती कोणाला माहीत नाही, कोणाला ठाऊक नाही. हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यातील खेड्यातील अंगणात जवळजवळ दीडशे वर्षांपूर्वी ती होळी झाली. ती होळी अजून विझली नाही. ती रावणाच्या चितेप्रमाणे विझणार नाही. स्वतंत्र झाल्याशिवाय, सीता शुद्ध झाल्याशिवाय ती होळी विझणार नाही!

३ : चार दिवसांचे चांदणे

दिगंबर रायांच्या मधल्या मुलाचा विवाह ठरला होता. नवरदेवासाठी व वधूसाठी त्यांना तलम हातसुताची मंगलवस्त्रे पाहिजे होती. परंतु कशी मिळणार? न कळत गुप्तपणे विणून घेतली तर? काय हरकत आहे? दिगंबर रायांच्या मनात विचार आला व विणकर राखाल याला त्यांनी बोलावणे पाठवले.

अशक्त झालेला राखाल दिगंबर रायांकडे आला. दिगंबर राय दिवाणखान्यात बसले होते. राखालने नमस्कार केला व तेथील बैठकीवर तो बसला. तेथे दुसरे कोणी नव्हते, “राखाल, अलीकडे तुम्ही मिलच्या सुताचेच कापड विणीत असाल?” दिगंबर रायांनी प्रश्न केला.

“ते मेलीचे मेलेले सूत! ते मी मेलो तरी हातात धरणार नाही. नाव तरी काय– म्हणे मेलीचे सूत! माझ्या घरी उपासमार होत आहे. परंतु माझ्याच्याने

कलेचा खून करवत नाही. जाडेभरडे सूत, देशी सूत, बायाबापड्यांचे सूत मला विणावेसे वाटत नाही; व ते मेलीचे तर नकोच नको! या हातांनी कला वाढवली, तिचाच खून करू का? या हाताने फूल वाढवले, ते कुस्करू? महाराज, दहापंधरा दिवसांत राखालची राख होईल! या हातांनी हल्ली मी नांगर धरतो! मला नाही सवय! मी मजूर झालो आहे! पाचपाचशे रुपयांची सणंगे विणणारा मी आज हमाल झालो आहे! हमाल झाल्याचे मला वाईट वाटत नाही, परंतु आज्या-पणज्यांची कला मरणार, याचेच वाईट वाटते! मागे माझे वडील होते. त्यांनी ते राजे लक्ष्मण राय व नवीनचंद्र राय होते ना, त्यांच्या घरच्या लग्नासाठी पाचपाचशे रुपयांची पातळे विणून दिली होती! कशी तलम होती सांगू! मी त्या वेळेस लहान होतो. ती कला शिकत होतो. पदरावर सुंदर फुले होती. परंतु मी अभागी! ही बोटे, हे हात पाहिले की वाईट वाटते!" राखालच्या डोळ्यांत खरोखर पाणी आले. त्या कलावानाचा मुखचंद्र दुःखाने काळवंडून गेला. पर्जन्यधारांनी आच्छादला.

"राखाल, माझ्या मुलाचा विवाह आहे. मुलासाठी धोतरजोडा व वधूसाठी दोन पातळे पाहिजेत. अगदी तलम, बारीक, सुंदर! परंतु तुम्हांला गुप्तपणे विणावी लागतील! माझ्या घरी तुम्हांला जागा देतो. तुम्ही येथे विणा." दिगंबर राय म्हणाले.

"चालेल. तुमचा आनंद मी का वाढवू नये? तुमचा आनंद मी जाणू शकतो. तुम्हांला ही मेलेल्या सुताची, गाई-बैल मारून चरबी लावलेल्या सुताची ही कापडे आवडत नसतील, ती सहन होत नसतील! तुम्ही कलावान लोक. कारागीर लोकांना आधार देणारे तुम्ही. तुमचे मन मी ओळखतो. येतो, माझी बायको, मी व मुलगा येथे येतो. विणून देतो विवाहमंगल वस्त्रे!" राखाल म्हणाला.

"पण सूत, बारीक सूत कोठे मिळेल?" दिगंबर रायांनी विचारले.

"माहीत नसलेल्या बायांकडे जपून ठेवलेले आहे काढून. त्या विकायला आणीत. कोणी घेईना. त्यांनाही सांगण्यात आले की, तुम्ही काढाल तर शिक्षा होईल. अमूक केले तर शिक्षा, तमूक केले तर शिक्षा, समुद्राच्या पाण्याचा घडा भरून आणला तरीही शिक्षा म्हणे! विचित्रच राजा आहे! समुद्राच्या पाण्यालाही किंमत? हवा, प्रकाश, यांनाही पुढे किंमत होईल की काय? गवतकाडी, झाडाचा पाला, यालाही किंमत पुढे पडणार का? कर पडणार का? बंदी होणार का? मग ढोरे मरतील, पोरे मरतील, दुनिया मरेल! कलियुगच खरोखर यांनी आणले म्हणायचे! का कल्पना? सूत मिळेल, माझ्या ओळखीच्या बायका

आहेत." त्यांच्याजवळून मी घेऊन येईन. परंतु मजजवळ पैसे नाहीत सूत विकत घ्यायला!" राखाल म्हणाला.

"ते माझ्याजवळून तुम्ही घेऊन जा, त्याची काळजी नको." दिगंबर राय म्हणाले.

राखाल गेला. गावोगाव भटकला व गुप्तपणे ते तलम, बारीक, नजर न ठरणारे सूत गोळा करून घेऊन आला. त्याच्या मदतीस त्याचा मुलगा व बायको होती. राखालला आज कितीतरी दिवसांनी आनंद मिळाला. दिगंबर रायांकडे त्या सर्वांना खाण्यापिण्यास मिळे, म्हणून का आनंद झाला? नाही. खाण्यापिण्याचा आनंद हा पशु-पक्ष्यांचा आनंद! कलेची पूजा करावयास मिळाली, देवाची पूजा हातांना, डोळ्यांना, पायांना करावयास मिळाली म्हणून त्यांना आनंद झाला. कोमेजलेल्या फुलावर पाणी शिंपल्याने ते जसे जरा टवटवीत दिसते, वाळलेल्या तृणपर्णावर निसर्गमातेने, निशादेवीने, उषाराणीने चार दवबिंदू टाकताच ते जसे टवटवीत हिरवे हिरवे दिसू लागते, त्याप्रमाणे राखालचे तेजहीन विकल मुखकमल टवटवीत दिसू लागले. त्याच्या तोंडावर आनंदकिरण नाचत होते. ते पाहा डोळे हसत आहेत, फुलत आहेत. 'झिनि झिनि झिनि झिनि बिनी चादरिया' बाहेर विणीत होता; आतही आनंदाचे वस्त्र, आनंदाचा पीतांबर विणून हृदयदेवाला नेसवीत होता. कलावानाचा आनंद कलावानच जाणे! त्याची ती समाधी, ती तन्मयता, ती स्वार्थनिरपेक्षता, सुखविन्मुखता, बाह्यविस्मृती त्याची त्यालाच पाहीत. त्याने विणलेल्या वस्त्रांत जी कोमलता व पवित्रता भासते, ती याचमुळे. त्याच्या हृदयाचा पवित्र आनंद त्या वस्त्रात उतरे व ते वस्त्र परिधान करणाऱ्यालाही उन्नत करी, पवित्र करी. ध्येयप्रवण करी! क्षुद्रत्वापासून, गुलामगिरीपासून, नीच सेवेपासून दूर ठेवी. कलावान कलावस्तूच जगाला देत नसतो; तद्द्वारा हृदय देत असतो, विचार देत असतो, भावना देत असतो, ध्येय देत असतो, धर्म देत असतो, देव देत असतो. जे आपण पाहतो, जे आपण खातो, ऐकतो, पितो, पेहरतो त्या सर्वांचा हृदयावर परिणाम होतो. प्रत्येक वस्तू व प्रत्येक विचार, प्रत्येक उच्चार व प्रत्येक आचार यांना शक्ती असते. त्यांना जीव असतो. त्यांचा परिणाम जीवनावर होत असतो. कलावानाची मनोभूमिका जितकी उंच असेल, तितकी उंच समाजाची मनोभूमिका तो नेत असतो.

राखाल आपल्या योगात मग्न झाला. योगच तो. त्याच्या इंद्रियांची ती योगस्थिती होती. झिरझिरीत, तलम विवाहकौतुकाची वस्त्रे तयार होऊ लागली.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

विवाहासाठी मन, बुद्धी, शरीर ही जी तयार केली जात असतात, त्याप्रमाणे वर्षभर ती वस्त्रे तयार केली जात होती.

विवाहाची वेळ समीप आली. सोनार अलंकार घडवू लागला, बायका लाडू बांधू लागल्या, राखाल वस्त्रे संपवू लागला. तो पाहा, सुंदर मंडप घातला जात आहे. तो मंडप कापडला आहे, तरी मिलच्या सुताच्या कापडाने कापडलेला नाही. जाडेभरडे आयाबहिणींच्या हातचे सूत, त्याची विणलेली जाड खादी, ती अत्यंत स्वच्छ धुवून आणून तिने मंडप कापडला आहे. मंडपाचे खांब लाल पागोठ्यांनी विणले गेले आहेत, कापडले गेले आहेत. मंडपाच्या सभोवती पीतांबराच्या चुण्या करून झालरी लावल्या आहेत. साऱ्या गावातील घाण झाडून निघत आहे. वधूकडील मंडळी उतरावयासाठी, जानोशासाठी एके ठिकाणी जागा ठरवलेली आहे. तेथेही सुंदर मंडप घातलेला आहे. हंड्या, झुंबरे व गोलक लावलेले आहेत. खांबांना सुंदर हिंदी चित्रकलेचे नमुने लावले आहेत. साऱ्या गावाला काम मिळाले आहे, धंदा मिळाला आहे; आनंदही मिळाला आहे. श्रीमंत व उदार दिगंबर रायांच्या मुलाचे लग्न, ते साऱ्या गावकऱ्यांचेच लग्न होते.

माळी फुलांचे हार गुंफीत होते, फुलांचे गुच्छ बांधीत होते. बागवान केळीची पाने कापून देत होता, मळेवाला भाजी– उत्कृष्ट भाजी आणून देत होता. ते पाहा प्रसिद्ध बाजेवाले आले आहेत. ते सनई इतकी सुस्वर आळवतात की, मंडळी जेवत असली तर लाडू हातात राहतो! खाण्यापिण्याचे भान ते विसरतात. उत्कृष्ट चौघडा वाजवणारे व उत्कृष्ट सनईवाले आले आहेत.

वधूकडची मंडळी आली. त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांची सारी व्यवस्था उत्कृष्ट ठेवण्यात आली होती. उद्या विवाहाची वेळा. सूर्यास्त होताच, पश्चिम दिशेचे व सूर्यनारायणाचे मीलन होताच वधूवरे परस्परांस माळा घालणार होती. आकाशातील ते लग्न व हे मर्त्य भूमीवरील लग्न! दिवसभर सूर्य दूर असतो. आपल्या पश्चिम समुद्रातील राजवाड्यातून, आनंदधामातून पूर्वेकडे जातो– दिवसभर भटकून, दमून, थकून जातो. परंतु सायंकाळी आपल्या प्रियेस– पश्चिम वधूस मिळतो. तिला सांगतो, "सखी, दिवसभर मी दूर असलो तरी माझ्या हृदयात प्रेम आहे– खरेच प्रेम आहे. प्रेमासाठी कर्तव्य विसरून चालणार नाही. प्रेम हे हृदयात फुललेले आहे. त्या प्रेमाचाच प्रकाश मी या जगास देत असतो- तो तुझ्या व माझ्या प्रेमाचा प्रकाश साऱ्या रोमरोमांतून बाहेर पडतो– त्रिभुवनात पसरतो हो. रुसू नको, रागावू नको." त्या दिव्य स्वर्गीय प्रेमाची भेट वर आकाशात होत असता दिगंबर रायांच्या मुलाचा विवाह लागावयाचा होता. गाई रानातून भरल्या कासेने, तृषार्त भूमीकडे धावत

जाणाऱ्या बेफाम नदीप्रमाणे धूळ उडवीत, गोठ्यात परत येत असतात त्या मंगल व वत्सल गोरज मुहूर्तावर तो विवाह लागावयाचा होता.

सारे बायकांचे सुखसोहळे चालले होते. वधूवरे अद्याप लहान होती. लहान मुलामुलींच्या लग्नात सारी मोठ्याच माणसांच्या मनाची हौस फेडून घ्यावयाची असते! ही दोन सरळ व अल्लड मुले, ती त्या वेळेस निमित्ताला धनी असतात. आता वर मिरवत जावयाचा होता. मंगल वाजंत्री वाजत आहेत. बार उडत आहेत. तो पाहा घोड्यावर नवरदेव बसला. त्याच्या अंगावर ते सुंदर कपडे आहेत. जणू चंद्रकिरणांचीच ती वस्त्रे बनवली आहेत असे दिसत आहे. नवरदेवावर चौऱ्या उडवल्या जात आहेत, मोर्चेले उडविली जात आहेत, अब्दागीर धरलेला आहे. आनंद सर्वत्र पसरून राहिला आहे. मिरवणूक आली. श्वशुर-श्वश्रूंनी नवरदेवाचे, त्या पवित्र अतिथीचे, त्या पवित्र दान मागावयास आलेल्या भिक्षेकऱ्यांचे स्वागत केले. एकच गर्दी– एकच आनंद! वराचा हात धरून त्याला मंडपात एका बाजूला मांडलेल्या पाटावर बसवण्यात आले. त्या ठिकाणी उपाध्ये मंडळी बसली आहेत. वेदमंत्रपठन सुरू झाले. भटजींच्या मुखांची व हातांची धावपळ सुरू झाली!

मंडप सारा भरून गेला आहे. ते पाहा दूरदूरचे आप्तेष्ट आले आहेत. ते सरकारी अधिकारीही लोडांशी बसले आहेत. सुंदर गालिचा घातलेला आहे. चांदीचे पानसुपारीचे तबक तेथे ठेवलेले आहे. स्वच्छ पिकदाणी आहे. मंडपात गोरगरीब सारे जमले आहेत. नवरदेवाची पूजा सुरू झाली. त्याचे पाय धुण्यात आले. त्याच्या कपाळाला गंध लावले. मंगलाष्टके सुरू झाली. 'सावधान, सावधान' शब्द उच्चारले जाऊ लागले. त्या लहान वधूवरांचे लक्ष तिकडे नव्हते. ती भटजींकडे पाहून हसत होती. मध्येच डोक्यावर टाकल्या जाणाऱ्या अक्षतांनी संतापत होती. काय सटासट तांदूळ मारतात, असे त्यांना वाटत होते. बसून बसून त्या छोट्या वधूवरांचे पाय दुखून आले. हिंडणारी, खेळणारी, उडणारी लहान चिमणी पाखरे ती. तेथे गप्प बसली होती. 'सावधान, सावधान' चालले होते. झटपट अंतरपाट उडवण्यात आला. परस्परांच्या गळ्यात माळा घालण्यात आल्या. 'वाजवा रे वाजवा!' बाजा सुरू झाला. एकच गर्दी उसळली. पानसुपारी वाटायला सुरुवात झाली. फुलांचे गुच्छ, अत्तर-गुलाब द्यावयास सुरुवात झाली.

मंडळी घरोघर जाऊ लागली. सरकारी अंमलदार गाड्याघोड्यांतून निघून गेले. निरोप देण्यात येऊ लागले. नमस्कार करून करून यजमानांचे हात दुखून आले. विवाह लागला. दुसऱ्या दिवशी पंगत होती. साऱ्या गावाला पंगत.

वाचनालय सातारा
विभाग

साऱ्यांनी वधूवरांस आशीर्वाद दिला, त्यांचे अभीष्ट चिंतन केले. रात्री वरात निघाली. दारू उडविली गेली. चंद्रज्योतींच्या प्रकाशात ती अलंकाराने नटवलेली वधूवरे सुंदर दिसत होती. विवाहाचा आजचा शेवटचा दिवस. आज साऱ्यांचे मानपान व्हावयाचे होते. कोणाला शेला, कोणाला पागोटे, कोणाला लुगडे, कोणाला खण– आज द्यावयाचे होते. आज पाठवणी होती, बोळवणी होती.

दिगंबर रायांनी राखालला बोलावले. त्याचा सत्कार केला. त्याला सोन्याचे कडे बक्षीस दिले! राखालच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. सोन्याचे कडे मिळाले म्हणून का? इतक्या लोकांत आपला गौरव केला म्हणून का? नाही, नाही. अजून रसज्ञ लोक, गुणज्ञ लोक, कलेची पूजा कशी करावी हे जाणणारे रसिक व सहृदय लोक हयात आहेत, याबद्दल त्याला आनंद झाला. मी मेलो तरी जोपर्यंत हे लोक आहेत तोपर्यंत कला मरणार नाही, हे मरू देणार नाहीत; द्राक्षाच्या वेलाला सुकू देणार नाहीत. कलावानांना धुंडाळून आणतील, कला जगेल. जगो, जगो– माझ्या पूर्वजांची कला जगो– याचा त्याला आनंद होत होता

विवाह झाला. गाणारे वाजवणारे निघून गेले. धर्ममार्तंड निघून गेले. पाहुणेराहुणे निघून गेले. गावातील गर्दी मोडली. पुन्हा रोजचे व्यवहार सुरू झाले.

४ : पोलिसांकडून छळवाद

सरकारी अधिकाऱ्यांजवळ कोणी तरी चुगली केली. दुसऱ्याचा मान क्षुद्र बुद्धीला सहन होत नसतो. राखालचा मान हा व्यक्तीचा नव्हता. साऱ्या विणकरवर्गाचा तो मान होता. परंतु त्याच्या गावच्या एका विणकराला हे सहन झाले नाही. राखाल विदेशी सूत विणणारांना नावे ठेवी. त्याचाही राग त्यांच्या मनात होताच. कोणी तरी सरकारी अधिकाऱ्यांजवळ चुगली केली!

राखाल घरी, आपल्या लहानशा घरी बसला होता. पुन्हा त्याला खावयाची फिकीर पडू लागली होती. परंतु ते सोन्याचे कडे विकावयाची त्याला इच्छा होत नव्हती. त्याच्या पत्नीने त्याला तो विचार सुचवला होता. तो एकदम तिच्यावर उसळून म्हणाला, "ते कडे विणाईची मजुरी नाही. तो कलेचा मान आहे. तिची ती पूजा आहे. देवाच्या अंगावरले दागिने विकून का पोट भरायचे? त्यापेक्षा मेलेले काय वाईट? पोटाची खळगी भरण्यासाठी देवाला नागवू?" त्याची बायको

म्हणाली, "आज तुम्ही जगाल वाचाल तर आणखी देवाच्या अंगावर असे दागिने घालाल."

"या जगात आणखी आता दागिने देवाला मिळणार नाहीत. हे हात यापुढे फुकट जाणार! तोडून टाकू का हे हात? यांना खावयास पाहिजे; परंतु देवाची पूजा करण्याचे नशिबी नाही बेट्यांच्या!" राखाल खिन्न व उद्विग्न होत म्हणाला. त्याच्या डोळ्यांत निर्मळ अश्रू आले.

ते पाहा पोलीस त्याला पकडावयासाठी आले आहेत. "तुला ठाण्यावर न्यावयाचे आहे. तू मोठा गुन्हा केला आहेस. न विणावयाची वस्तू तू विणली आहेस. करावयाची नाही ती गोष्ट कोणी केली तर शिक्षा होते. चल!" एकजण म्हणाला.

"मी तयार आहे. मला माझे हात तोडायला, हे निरुपयोगी हात तोडायला धैर्य होत नाही, तुम्ही माझ्या मदतीला या व हे काम करा. मी आभार मानीन. सरकारचे उपकार होतील!" राखाल म्हणाला.

"चल, वटवट बंद कर. हातावर सुटतोस, का मान द्यावी लागते! कोणाला माहीत? असे उद्धटपणे बोललास तर जान गमावशील!" पोलीस म्हणाला.

"मग तर सोन्याहून पिवळे! इतके भाग्य माझ्या नशिबी असेल असे वाटत नव्हते. म्हणून मी हातच म्हटले. माझी बायको व मुलगा यांनाही मारा. म्हणजे नीच सेवा करून जगण्याची त्यांना इच्छा होणार नाही. पतित होऊन, व्रतच्युत होऊन, स्वधर्मच्युत होऊन जगण्याची त्यांना इच्छा होणार नाही. त्यांनाही मारून मोहापासून दूर घेऊन चला. आज इतके दिवस माझ्या स्वधर्माची पूजा मला करावयाला सापडली नाही. मी भिऊन राहिलो. मी पूजा चालविली पाहिजे होती. उघड उघड चालवली पाहिजे होती. माझ्या भित्रेपणाबद्दल मला मारा. आम्हांला साऱ्यांनाच मारा!" राखाल बोलत होता. बायको रडत होती. मुलगा घरात नव्हता. पोलीस मुसक्या बांधून राखालला घेऊन गेले.

विनयी पत्नी दारात अश्रू ढाळीत, केविलवाणी पाहात उभी राहिली व शेवटी ती केळीप्रमाणे पडली! मुलगा बाहेर गेला होता. त्याला बातमी लागली. तो धावत घरी आला, तो आई निश्चेष्ट पडलेली! मुलगा आईला वारा घालू लागला. तिच्या डोळ्यांना पाणी लावू लागला. "मा, मा गो–मा, मा!" तो रडू लागला. आली, मा– शुद्धीवर आली.

"काय रे बाळ, कसे रे होईल, ते मांग घेऊन गेले रे. मारतील, छळतील. काय काय करतील? बाळ?" असे म्हणून मुलाला कवटाळून मा रडत

होती. हंबरडा फोडीत होती. बाळही रडत होता. त्या दोघांचे सांत्वन कोण करणार?

राखालला पोलीस ठाण्यावर नेण्यात आले.

"तू कोणाच्या सांगण्यावरून विणलेस, का विणलेस, कोणाला विकलेस, सांग?" असे त्याला धमकावण्यात आले.

अधिकाऱ्यांना कळले होते. परंतु त्याच्या तोंडून दिगंबर रायांचे नाव काढवयाचे होते. परंतु राखाल एक शब्द बोलेना, "मी विणणार, हजारदा विणीन, वाटेल त्याला विकीन. तुम्ही मला मारा, वाटेल ते करा, मी काही एक बोलू इच्छित नाही."

त्याला वेत मारण्यात आले. तो कलावान वीर हार गेला नाही. त्याला एका अंधाऱ्या खोलीत कोंडण्यात आले. उपाशी राखण्यात आले. हाल सुरू झाले. धर्माची पूजा करणाऱ्याला, कलेची पूजा करणाऱ्याला हाल म्हणजे हारच वाटतो! इंग्रज का कलेचे उपासक आहेत? गोरे लोक का कलेचे उपासक आहेत? ग्रीक लोक का कलेचे उपासक होते? गुलामाने जर उत्कृष्ट शिल्प-वस्तू तयार केली तर ग्रीक लोक त्याला देहांत प्रायश्चित्त देत! परंतु पेरिक्लिस,– थोर पेरिक्लिस! त्याने तो कायदा बदलला. 'खरे कलापूजक व्हा.' असे ग्रीक लोकांस त्याने सांगितले. ज्याला कलेची खरी भक्ती आहे, तो कलापूजकाला, कलाभक्ताला पाहून नाचेल, आनंदेल. भक्ताला खरा भक्त पाहून अत्यानंद होतो. संतांची भेट म्हणजे दिव्य दर्शन आहे. इंग्रज हे कलापूजक नव्हते. ते धनपूजक होते. त्यांनी कलाभक्तांचा उच्छेद मांडला. छळ मांडला.

वार्ता दिगंबर रायांच्या कानावर गेली. तो दिलदार पुरुष कळवळला. माझ्यासाठी बिचाऱ्या राखालला राखेचे तोबरे! दिगंबर राय पोलीस अधिकाऱ्यांना भेटले व म्हणाले, "मी खरा अपराधी आहे. मला शासन करा. मी त्याला विणायला सांगितले. मला हे मिलचे सूत पसंत नाही. याहून सुंदर व तलम, निर्मल व धर्मळ असे आयाबहिणींच्या पवित्र बोटांनी काढलेले सूत, ते मला प्राणाहूनही प्रिय आहे. त्याचेच पवित्र वस्त्र मला मंगल विवाहासाठी पाहिजे होते. तो गरीब बिचारा, त्याने माझे म्हणणे ऐकले. मला शिक्षा करा."

दिगंबर राय गिरफदार झाले. त्यांच्याबद्दल अनेकांना मत्सर वाटतच होता. त्यांची कीर्ती, लोकप्रियता अनेकांना सहन होत नव्हती. दिगंबर रायांना सात वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. पन्नाशी उलटून गेलेली. सुखात वाढलेले दिगंबर राय. त्यांना तुरुंगात पाठवण्यात आले. त्याच्या हातापायांत शृंखला घालून नेण्यात आले. राखालच्या डोळ्यांत अश्रूंचे पूर आले. हा थोर

पुरुष तुरुंगात मरणार, हा कलेचा चाहता कारागृहात मरणार, असे त्याचे हृदय त्याला सांगू लागले.

दिगंबर रायांची तुरुंगात रवानगी झाली. आता राखालवर खटला सुरू झाला. निर्भय, खरा कलाभक्त राखाल! तो म्हणाला, "जोपर्यंत माझ्या जिवात जीव आहे, तोपर्यंत मी उघड तलम कपडा विणीन! मी बंड करीन! कलेचा खून मी उघड्या डोळ्यांनी पाहणार नाही. ही बोटे छाटा, हात तोडा, माझ्या पायाच्या बोटांनी विणीन. पाय तोडा. बायकोला शिकवीन. मुलाला शिकवीन, त्यांना विणायला लावीन. माझ्या हृदयात विणीन, डोक्यात विणीन!" राखाल एखाद्या ध्येयासक्ताप्रमाणे बोलत होता.

अधिकारी संतापले. लोकांना दहशत बसवल्याशिवाय भागणार नाही. हे बंड वेळीच दाबले पाहिजे. हा जिवंत अंकुर मारून टाकला पाहिजे. लोकांना जरब बसली पाहिजे. वरच्या अधिकाऱ्यांकडून याप्रमाणे लिहून आले. राखाल, कलाभक्त राखाल, तेजस्वी, धर्मभक्त, स्वधर्मनिष्ठ राखाल, त्याला भर चौकात फाशी देण्याचे ठरले! फाशीची शिक्षा राखालला फर्मावण्यात आली. कायदे न मानणारा व कायदे मानू नका असे चिथावणारा हा बंडखोर आहे. असा त्याच्यावर आरोप लादण्यात आला. याचे नुसते हात छाटून, बोटे छाटून भागणार नाही. याला जिवंत ठेवणे धोक्याचे आहे, असे सरकारने जाहीर केले. लोकशाहीला हा विघातक आहे. राखालला जिवंत राखण्यात लोकशांतीला धोका आहे, असे सरकारने जाहीर केले.

राखालची पत्नी, त्याचा मुलगा, कोठे जाणार ती? ती अधिकाऱ्यांच्या– पोलीस अधिकाऱ्यांच्या दारात जाऊन रडली. त्यांना दंडे मारून हाकलून देण्यात आले. अरेरे! या पृथ्वीने दुभंगून आपणाला पोटात घ्यावे, असे त्या उभयतांना वाटले.

मातेने एक निश्चय केला. पती फासावर चढवला जाण्यापूर्वी आपणच या जगातून नाहीसे व्हावे असे तिने ठरवले. ती आपल्या बाळाला म्हणाली, "बाळ, चल, आपण त्या भेलापुष्कर तीर्थाला जाऊ. देवाची प्रार्थना करू."

मुलगा आईबरोबर निघाला. घरातले देव घेऊन मायलेकरे निघाली. भेलापुष्करला मायलेकरे आली. बाळ तलावाच्या काठावर उभा होता. मातेने बाळाला पाण्यात लोटले व आपण पाण्यात उडी घेतली. बुड बुड बुड– गेले-दोन तीन गटांगळ्या आणि सारे शांत! त्या पवित्र पुष्कर तडागाने ते मायलेक-दुःखाने होरपळलेले ते जीव– त्यांना आपल्यात घेतले, त्यांचे अश्रू आपल्या अनंत अश्रूंत मिळवून टाकले.

बाल विभाग

राखालच्या गावात आज त्याला फाशी होणार होती! ज्या गावात त्याचे आई-बाप त्याचे पूज्य पूर्वज नांदले, ज्या गावाची कीर्ती त्यांनी आसमंतात आपल्या कलेने वाढवली, ज्या गावाला त्यांनी श्रेष्ठत्व दिले, मानमान्यता दिली, त्या गावात आज कलापूजक राखाल चोर-डाकू-खुनी समजून फाशी जाणार होता! ज्या गावात राखालच्या पूर्वजांना मानसन्मान मिळे, राजेरजवाडे बक्षीसे पाठवून देत, त्याच गावात राखाल आज दीन भणंगाप्रमाणे फासावर लटकला जाणार होता!

गावातील सारे लोक भयभीत झाले. सरकारच्या आमंत्रणावरून ही फाशी पाहावयास जाणे त्यांना भाग पडले! मी थोर कलापूजकाचा कसा अमानुष अंत करतो ते पाहावयास चला, अशी सरकारने, या नवीन राजाने प्रजेला हुकूमवजा सांगी केली! जाण्याची इच्छा नसूनही, हे भेसूर दृश्य पाहायची इच्छा नसूनही, आपल्या धंद्याला ज्याने मान्यता मिळवून दिली, त्या थोर कलावानाचा— कारागिराचा तो अमानुष अंत पाहावयाची इच्छा नसूनही अनेकांना जावे लागले! तो पाहा, दुःखी कष्टी लोकांचा जबरीने गोळा केलेला समुदाय! घरांतून साऱ्यांना हे भेसूर दृश्य पाहावयास पोलिसांनी दामटवीत आणले. डोळ्यांवर अश्रूंचे पांघरूण आले होते. साऱ्यांची दृष्टी आंधळी झाली होती. ते खुर्चीवर अधिकारी बसले आहेत. तो मध्ये एक गोरा अधिकारी आहे. आजूबाजूला सशस्त्र लोकांचा पहारा आहे. तो पाहा फाशीच्या ठिकाणी राखाल, भक्त राखाल— गंभीरपणे उभा आहे, शांतपणे उभा आहे. त्या बोहल्यावर चढण्यासाठी तो वरपुत्र उभा आहे. कलावधूशी लग्न— चिरलग्न लावून घेण्यासाठी तो उभा आहे. सरकारचे तो मनातून आभार मानीत आहे. चिरलग्न— आज माझे चिरलग्न लागणार! लग्न-विवाह-छे- कला ही माझी वधू नसून माझी देवता आहे. तिच्या पूजेला मी जाणार. तिच्या सेवेला जाणार. मी तिचा चिरसेवक, चिरपाईक होणार. परमेश्वराचे चिरसेवक होण्याचे भाग्य पाहिजे असेल तर आगीतून जावे लागते, मरणातून जावे लागते. फास, सूळ, गोळी, विष यांना मिठी मारून जावे लागते. फासाचा सर गळ्यात घालून— हा पवित्र दोरा गळ्यात घालून ईश्वराची पूजा करावयास जाता येते. काही पंथांत ईश्वराचा भक्त होण्यासाठी, त्या पंथाची दीक्षा घेण्यासाठी तप्तमुद्रा देतात— त्याचा अर्थही ईश्वराचा होण्यासाठी आधी भाजून घे; भाजल्याशिवाय दाण्यातून सुंदर स्वच्छ लाही कशी निघणार? राखाल कलादेवीची उपासना कायमची करायला मिळावी, म्हणून तिला प्राणांची पूजा बांधणार होता. रावणाने आपल्या शिरकमळांची माला शंकराला, मृत्युंजयाला घातली, तेव्हा मृत्युंजयाने त्याला आत्मलिंग दिले, सर्वस्व दिले. राखाल आपल्या

आराध्यदेवाला, सकल कलाधिराजाला– जो कलाधिराज सकाळ-सायंकाळ पूर्व-पश्चिमेच्या कारखान्यांत शेले, शालू, पैठण्या, पीतांबर, गालीचे भराभर अनंत रंगांचे, अनंत छटांचे विणून दाखवतो व ती कला लेकरांना शिकवतो– तो कलाधिराज त्याला शिरकमळांची पूजा अर्पण करणार होता. त्याला अत्यंत आनंद होत होता. ते शुद्धतम बलिदान होते. ते ख्रिस्त-सॉक्रेटिसाचे बलिदान होते! ते मीरेचे विषप्राशन होते– ब्रूनोचे जाळून घेणे होते!

सरकारी अधिकाऱ्याने लोकांना काही शब्द सांगितले, "प्रजाजन हो, आमच्या कायद्याखाली वागत असलेल्या प्रजाजनांनो, हा बंडखोर, घमेंडखोर राखाल फाशी दिला जात आहे. सरकारचे योग्य हुकूम हा अमान्य करीत आहे, पुन्हा पुन्हा उद्धटपणे 'अमान्य' असे सांगत आहे. जे सरकार ईश्वराने तुमच्यावर आणले, त्याचे हुकूम ऐकणे हे तुमचे पहिले कर्तव्य आहे. जो हे कर्तव्य अवमानील, सरकारचा हुकूम पायाखाली तुडवील, लोकांस वाईट उदाहरण घालून देईल, कायदेभंग शिकवील, या बंडखोराला, त्या सरकारद्रोह्याला व म्हणूनच समाजद्रोह्याला हे असे शासन मिळत असते! सारेजण लक्षात धरा व आज्ञाधारक राहा; त्यतच सरकारचे व तुमचे हित आहे. कल्याण आहे, शांती आहे. आरोपीला अजूनही माफी मिळू शकेल. जर तो कायद्याप्रमाणे वागायचे कबूल करील... आरोपीला काही सांगावयाचे आहे काय?"

सारा खिन्न लोकसमुदाय जरा दृष्टी वर करून, अश्रू निमूटपणे पुसून कैद्याकडे पाहू लागला. आपण रडतो म्हणून तर आपणास फाशीची शिक्षा नाही ना होणार? गोळ्या नाही ना घालणार? हाही भीतिप्रद विचार अनेकांच्या मनात आला. अश्रू आंतल्या आत दाबू लागले ते. चोरून पुसून टाकू लागले. आरोपी काय म्हणतो आहे? काही तरी बोलतो आहे? माफी मागणार काय? ऐका, ऐका. आरोपी बोलत आहे. समोर त्याच्या फास उभा आहे. तो आरोपी बोलत आहे. त्याचे शब्द, गंभीर शब्द–ऐका.

"ईश्वराच्या चरणाशी जावयास मी अधीर आहे. ज्या हातांनी श्रेष्ठ कलेची मी उपासना केली, ते हात घाणेरड्या कामाला मी लावणार नाही. माझ्या आयाबहिणींनी कातलेले चंद्रकिरणांसारखे सुंदर सूत ते जर या बोटांना विणता येत नसेल, तर मला जगावयाची इच्छा नाही. या राज्यात राहणे हे पाप आहे, कारण माझ्या स्वधर्माची मला पूजा करता येणार नाही. जेथे मला कोणी विरोध करणार नाही, जेथे मनमुराद कलेची उपासना मला करता येईल, तेथेच मला जाऊ दे. माझी बायको व माझा मुलगा यांनाही माझ्या पाठोपाठ पाठवा. त्यांची जगात विटंबना नको. त्यांच्या हातूनही पाप नको. माझ्या पाठोपाठ त्यांना

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

फासावर द्या किंवा गोळ्या घालून ठार करा. माझ्या देवाच्या मानेवर तुम्ही सुरी ठेवली आहे; तर माझ्या मानेवरही ठेवा, हेच माझे मागणे आहे. माझ्या कलेला फाशी देत आहात तर कलाभक्ताला तरी कशाला जिवंत ठेवता? त्याला जिवंत राहवणार नाही. ज्याला देव नाहीसा करावयाचा आहे, त्याने भक्त मारावे म्हणजे देव नाहीसा होईल! भक्तासाठी देव आहे. कलापूजकांसाठी कला आहे. कलापूजक फासावर द्या म्हणजे कला आपोआप मरेल! ही माझी मान त्या फासाला कवटाळण्यासाठी अधीर आहे. तो कलेचा अमर आत्मा बोलावीत आहे. उशीर नको. बंधूंनो, राम राम. मी देवाकडे चाललो!"

"हरामखोराला फासावर चढवा, चढवा; त्याचे प्रेत कोल्ह्या-कुत्र्यांसमोर फेकून द्या." अधिकाऱ्यांचा हुकूम आला. राखालने मधुर स्मित केले. ते मृत्यूला मारते झाले! राखालला उभे केले. फासाचे त्याने चुंबन घेतले– हात जोडले. ढकलला गेला– राखालचा देह खाली लोंबकळला. माती मातीला मिळण्यासाठी खाली येऊ लागली, चैतन्य चैतन्यात उडून गेले, ज्योत ज्योतीत मिळून गेली. कलापूजक कलातीतात मिसळून गेला!

९ : दिगंबर रायांचा अंत

राखाल सहकुटुंब देवाघरी देवपूजा करावयास गेला. दिगंबर राय तुरुंगात होते. त्यांना त्या दुष्टांनी तेलाच्या जड घाण्याला बैलाप्रमाणे जुंपले. इतरही अभागी कैदी होते. ते असेच कोणी कलावान होते. कंपनी ज्या किंमतीत मागेल त्या किंमतीत फक्त कंपनीचाच माल विकावयाचा; दुसऱ्याचा खाजगी माल विणून विकावयाचा नाही. कंपनी विकत घेऊन वाटेल त्या किंमतीस जगाला विकील. विणकराजवळून चार आण्याला घेऊन गिऱ्हाइकास दहा रुपयांस विकील, असा जो कंपनीने अत्यंत नीच कायदा पैसे उकळण्यासाठी सुरू केला होता– त्या कायद्याला न मानल्यामुळे ते कैदी आले होते. त्या वेळच्या तुरुंगात कलापूजक पवित्र आत्मेच भरलेले होते! त्यांना फटके मारून त्यांची गाढवावरून धिंड गावोगांव काढीत, गावोगांव त्याला फटके मारीत. शेवटी तुरुंगात लोटीत! केवढा अन्याय! कंपनीलाच माल फक्त विकावयाचा व ते देतील ती किंमत! माल उत्कृष्ट पाहिजे. गाई-गरीब हिंदुस्थानच्या गाई! पिळून पिळून घेतले गोऱ्या राक्षसाने. दिगंबर रायांना त्या अभागी, परंतु स्वामिभानी दिलदार कारागिरांबरोबर काम करावयास लाज वाटत नसे. ते आपली सारी शक्ती

लावीत. ते वृद्ध झाले होते. तरी आपला प्राण कोल्हू ओढण्यात ओतीत. इतरांना त्रास होऊ नये म्हणून ते जपत. आपली शिकस्त करीत. तरी त्यांच्यावरचे पोलीस "अच्छा तऱ्हेसे जोर लगाव" असे म्हणून दिगंबर रायांच्या पाठीत मारीत, ढुंगणावर मारीत! अरेरे– ज्याने हजारांना आधार दिला, त्याच्या अंगावर दंडे मारले जात होते!

दिगंबर रायांच्या हाताला फोड आले. ते मृदू— मऊ हात... ते सुखी शरीर... त्याची दोन दिवसांत माती झाली– तरी दिगंबर राय एक शब्द बोलत नसत. ते जणू सुखदुःखातीत योगी झाले होते. दुःखातही जगन्माउलीचाच जणू हात त्यांना दिसे. ते मनात म्हणत, "आई, तू मज मार, मार! आई, तू मज मार, मार!"

दिगंबर रायांच्या अंगात ताप भरला होता तरी ते निजले नाहीत. त्यांनी कोणाला सांगितले नाही. ताप आल्यामुळे ते त्यांचे एकेकाळी सुंदर असणारे क्षीण झालेले डोळे लाल झाले आहेत. त्यांच्या नाकातून भराभरा कढत श्वास निघत आहेत, अंग थरथरत आहे, घशाला कोरड पडली आहे. डोके भ्रमत आहे. पडू असे त्यांना वाटत आहे. तरी ते घाण्याला लागले. पडले! दिगंबर राय पडले!! पोलिसांनी वॉर्डरांनी दंड मारले. "ढोंग करता है साला, पेट देखो कैसा हत्तीके माफक है. उठो, खडे रहो. ढोंगबाजी नही चलेगी इधर, बाबू!" असे म्हणून दंडे मारले. दिगंबर राय– साधुचरित दिगंबर राय– ते धडपडत आहेत. पुन्हा उठत आहेत. पुन्हा कोलमडत आहेत. पुन्हा मार बसत आहे.

ते राक्षसी दृश्य पाहून त्या इतर कैद्यांना काहीच वाटले नाही? तो पाहा एक रागाने थरथरत आहे. त्याचे डोळे पाहा, तो पाहा ओठ चावीत आहे. मुठी वळीत आहे. एकदम त्याने उडी घेतली. तो दंडा हिसकावून घेतला व त्या वॉर्डरला तो बडवू लागला. दुसरेही कैदी शिपायाचा दंडा घेऊन हाणू लागले. शिट्ट्या झाल्या. मग त्या कैद्यांनी खूप सूड उगवला! तेथे वॉर्डर, शिपाई व दिगंबर राय तिघे बेशुद्ध पडले होते!

तुरुंगातील सारी शक्ती तेथे जमा झाली. दिगंबर रायांना त्यांच्या कोठडीत फेकून देण्यात आले. पोलीस व वॉर्डर यांना औषधपाणी मलमपट्टी वगैरे करण्यात आली. त्या इतर पाच कैद्यांना प्रत्येकी तीस तीस फटक्यांची शिक्षा देण्यात आली! ती ताबडतोब अंमलात आणण्यात आली व त्यांनाही कोठडीत फेकून देण्यात आले. "मर जाव सब!" कोणी म्हणाले.

"पाणी–पाणी!" दिगंबर राय कण्हत म्हणाले. अंगात अपरंपार ताप होता. ते तळमळत होते. कोण पाणी देणार? तेथे कोण होते? कोणी नव्हते.

५-३०
७४५१२
ग्रा. वि. न. १९११
कि-१५/-

"हाय-पाणी- मा गो मा! मा!" दिगंबर रायांनी शेतकऱ्यांच्या मुलांना दुधे द्यावी, त्यांना पाण्याचा थेंब– अंगाची लाही लाही होत असता मिळू शकला नाही. दिगंबर राय, लौकरच ताप शांत होईल बरे तुमचा! लौकरच सारे अंग कसे थंडगार होईल! मग पुन्हा मुळीच ताप येणार नाही!! हा शेवटचा ताप, थोडा आणखी सहन करा!! "ओ रे दीनबंधू! पार कर कृपासिंधू" कृपासिंधूने तहानलेल्या वासराची हाक ऐकली. दिगंबर राय त्या अंधारमय कोठडीत शांत झाले– व ज्योतिर्मय परमेश्वरात मिळून गेले! त्यांच्या पाठोपाठ पाच फटके खाऊन विव्हळणारे ते त्यांचे मित्र– तेही एकापाठोपाठ लगबग करीत आले. सरकारने यमराजाकडे कारागीर लोकांच्या दिव्य जीवनदुग्धाचा रतीब लावला होता!

६ : स्नेहमयीचा अपार शोक

दिगंबर रायांची पत्नी-स्नेहमयी– तिच्या मनाची काय स्थिती झाली असेल? मोठा मुलगा निरुपयोगी होता. लहान मुलगा– ज्याचे लग्न लागले होते, त्याला तिने सासुरवाडीला पाठवले. ती मोकळी झाली. ती एकटी पायांनी कलकत्त्याला गेली. तिच्या पतीचे काही बडे मित्र होते. त्यांची घरे धुंडाळीत ती गेली. दिगंबर रायांची पत्नी आपल्याकडे आल्याची कुणकुण जर पोलिसांना, सरकारच्या पित्यांना कळली तर आपलाही सत्यानाश व्हावयाचा– म्हणून ते कोणी स्नेहमयीस दारात उभे करीनातसे झाले. गरीब स्नेहमयी! जिने खेड्यापाड्यांतून गोरगरिबांना अपार मातृवत् स्नेहरस दिला, तिला त्या बड्या धेंडांकडून इवलीही करुणा दाखवण्यात येऊ नये काय? ती वणवण करीत हिंडे. कोठे रस्त्याच्या कडेला झोपे. ना खायला, ना प्यायला. गरीब बिचारी स्नेहमयी! थकून भागून गंगेच्या किनाऱ्यावर जाऊन बसली होती. घाटावर बसून गंगेमध्ये नेत्रगंगा सोडीत होती.

तो कोण बरे पोक्त वयाचा पुरुष? चेहरा मोठा रुबाबदार, गंभीर आहे. परंतु त्या डोळ्यांत वात्सल्यही आहे का? रडणाऱ्या केविलवाण्या स्नेहमयीला पाहून तो पुढे आला व म्हणाला, "आपण का रडता? काय दुःख आहे? माझ्या घरी चला."

ते प्रेमळ शब्द स्नेहमयीने ऐकले, "आपण स्वप्नात तर नाही ना, हे शब्द ऐकत? या जगात असे शब्द ऐकायला मिळतील का? हो, आपणच असे शब्द नव्हतो का बोलत? आपल्यासारखा दुसरा कोणीच का नसेल!"

"उठा, माई उठा– चला, पलीकडे माझी गाडी उभी आहे. आपण गाडीत बसून जाऊ." तो गृहस्थ म्हणाला.

स्नेहमयी त्या गाडीत बसली. तो पोक्त धर्मात्मा बसला. घोड्याची गाडी जाऊ लागली. सायंकाळ होत आली होती. भागीरथीवरचे शीतल भक्तिमय वारे येत होते. स्नेहमयीचे अश्रू सुकवू पाहात होते.

स्नेहमयीने रडत रडत सारी हकीकत सांगितली! "बिचारा राखाल तो तर फासावर दिला गेला. कोल्ह्या-कुत्र्यांकडून त्याचे प्रेम खाववण्यात आले. त्याला धर्मसंस्कारही करू दिला नाही मांगांनी! पण मी कशाला त्यांना नावे ठेवू. आपले दुर्दैव, राखालचे दुर्दैव! राखालची पत्नी व मुलगाही म्हणे भोलापुष्कर तलावात मेलेली सापडली! कोणी राहिले नाही. ते तुरुंगात आहेत. सात वर्षे! श्रमाची सवय नाही हो. मागे एकदा जरा उन्हातून शेतावर गेले, तर घेरी येऊन पडले होते! त्यांना कसे हो हाल सहन होतील! त्यांचे फुलासारखे प्राण ते तेथे कोमेजून जातील! पाय दुखायचे अलीकडे त्यांचे. मी रात्री चेपायची. उशाला दोन मऊ मऊ उशा त्यांना लागायच्या! तेथे कोण पाय चेपील, डोक्याला तेल कोण चोळील!

हाय रे देवा; तुम्ही त्यांची करा हो सुटका. माझे धर्मबंधू व्हा. काय गुन्हा हो केला? मुलाच्या लग्नासाठी बारीक धोतर विणून घेतले! ते निर्दोष आहेत. तिळभर नाही हो दोष. सारा जन्म परोपकारात गेला त्यांचा. म्हणायचे, आधी गरिबाला द्यावे. घरात एखादवेळेस मुळीच दूध राहावयाचे नाही. वाटून टाकावयाचे. म्हणायचे तो आजारी आहे, फलाण्याचा मुलगा आजारी आहे. एक दिवस रात्री निजताना प्यावयास देण्यासाठी गाईचे दूध थोडी साखर घालून ठेवले होते. रोज रात्री कढत दुधाचा घोट घेऊन निजत. म्हणजे जरा झोप लागे. शेजारी हेरंब-चरण आजारी होते. त्यांना आयत्या वेळी रात्री दूध हवे होते. मी नाही म्हटले. औषध सकाळी द्यायचे टरले त्यांना, कारण दूध नव्हते. निजावयाच्या वेळेस मी चांदीच्या फुलपात्रात घालून दूध नेऊन दिले. "दूध होते तर घरात. तू खोटे बोललीस. माझ्या पोटात जाऊन का सोने होईल– वेडी!" असे म्हणून हेरंबचरणांकडे दूध घेऊन गेले व म्हणाले, "हेरंबबाबू, दूध मिळाले. ही पूड घ्या व वर हे दूध घ्या!" असे होते हो. देवाने अशी का हो म्हातारपणी दशा आणावी! देव– कसा हो असा निष्ठुर देव– सात वर्षे! सात दिवसही तुरुंगात, त्या नरकात नाही हो जगावयाचे. फुलाला आगीत की हो टाकले! माझे प्राण, माझे सर्वस्व नेले– हिरावून नेले– हाल हाल मांडले. येथे त्यांचे मित्र होते. मी त्यांच्याकडे सांगावयास आले की, पाहा त्यांच्या सुटकेची

खटपट करून! मी गयावया केल्या, परंतु ते स्नेही, त्यांचे स्नेही मला दारात उभी राहू देत ना. कधी घरात असून घरात नाही असे नोकर, देवडीवाला येऊन सांगे. मी अबला– हतभागिनी– पापिणी- काय करू? ही गंगामाई हीच आता आधार! तुम्ही वाचवा हो त्यांना. आगीतून काढा हो फूल, घाणीतून काढा हो हिरा! माझे धर्मबंधू व्हा-व्हा– व्हा! मला पदरात घ्या." स्नेहमयीची ती करुणामय कहाणी ऐकून त्या धर्मात्म्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्याने चादरीने आपले अश्रू पुसले. "मी खटपट करतो माई. तोपर्यंत माझ्याकडे राहा. मी शक्य ते सारे करतो." ते म्हणाले.

गाडी घरी आली. स्नेहमयीचे प्रेमपूर्वक स्वागत झाले. परंतु तिचे लक्ष खाण्यापिण्यात, झोपण्यात कशात नव्हते. दोन घास आज तिने स्नान करून खाल्ले व जपमाळ घेऊन तुळशीजवळ जपत बसली. रात्री अंथरुणावर निमित्ताला ती पडली. परंतु पुन्हा उठून रामरायाला आळवीत राहिली.

दिनेशचंद्रांची मोठमोठ्या अधिकाऱ्यांशी ओळख होती. ते वरती भेटले व त्यांच्या शब्दाला, त्यांच्या वकिलीला यश आले. दिगंबर रायांना सोडून देण्याचे आम्ही लिहितो, असे अधिकाऱ्यांनी दिनेशचंद्रांना सांगितले. दिनेशचंद्रांना अत्यानंद झाला. त्या आनंदाला तुलना नव्हती. दुसऱ्याचे दुःख दूर करता यावे व मग जो आनंद होतो, त्याची कल्पना ज्याची त्यालाच येणार!

दिनेशचंद्रांनी स्नेहमयीला ती अमृतमयी वार्ता सांगितली. तिच्या जीवनात जीवन आले, डोळ्यांत तेज आले, शरीरात चैतन्य आले, कुडीत जणू प्राण परत आले. "मी आपली ऋणी आहे. महाराज, अनाथावर उपकार केलेत– मी जन्मोजन्मी विसरणार नाही." स्नेहमयी म्हणाली.

"देवाची कृपा, मी कोण!" ते म्हणाले.

"मी आता माझ्या गावी जाते. ते येथील. तुरुंगाच्या दाराशी गाडी घेऊन जाते. त्यांना घेऊन येते. माझ्या राजाला घेऊन येते. त्यांना चालवतही नसेल. त्यांचा हात धरून गाडीत बसवीन. मी जाते. महाराज, धर्मभगिनीला आशीर्वाद द्या. निरोप द्या!" स्नेहमयी म्हणाली. स्नेहमयीने घरातील नारीजनांचा निरोप घेतला. तिला कुंकू लावण्यात आले. जणू गेलेले कुंकू परत आले. जाणारी-विझणारी वात– पुढे सरकवण्यात आली. स्नेहमयी निघाली.

"पायी कशा जाणार? माझी गाडी घेऊन घरी जा. मग पाठवा परत. बरोबर फराळाचे न्या. वाटेत दोन घास तरी खा." दिनेशचंद्र म्हणाले.

त्यांनी गाडी व गाडीवान दिला. स्नेहमयीला ते अंतर किती लांब वाटले! पंख असते तर, अप्सरांना पंख असतात ते मला अर्धी घटका मिळते तर– मला

पाखराचे रूप घेता आले असते तर... त्यांच्या तुरुंगातील गजांतून आत पाहिले असते. त्यांना कोणी पाणी न देता तर मी चोचीने त्यांच्या तोंडात पाणी घातले असते!

त्या रात्री दिगंबर राय पाणी पाणी करीत होते. स्नेहमयी मनात म्हणत होती, "मी त्यांना पाणी चोचीने दिले असते. माझ्या पंखांनी त्यांच्यावर नाचून फिरून त्यांना वारा घातला असता. त्यांची तलखी दूर केली असती. मी गाणी गाऊन त्यांना रिझवले असते. मी त्यांना मनमुराद पाहिले असते. त्यांच्याभोवती हिंडले असते. त्यांच्याकडे वाकडे पाहणाऱ्यांच्या डोळ्यांना चोच मारली असती! देवा– दे रे मला पंख– दे रे थोडा वेळ! उद्या भेटतील मला. अंगाला मग तेल लावीत. चोळीन. अंग दुखू लागले असेल. तेथे नसेल अंथरावयास, नसेल पांघरावयास, तर गादीगिर्दी कोठली? रात्रभर पाय चेपीत बशीन. गाणी म्हणीन व झोपवीन. कपाळाला उद्या रात्री तेल चोळीन. कढत कडकडीत साखर घातलेले दूध देईन. पुन्हा हिंदू-फिरू लागतील. शेतकरी चौकशीला येतील. बारा तास– व माझे हात त्यांच्या पायाजवळ असतील!

बाळ विभाग

स्नेहमीय घरी आली. ती दिनेशचंद्रांची गाडी गेली. मुलगा घरी ऐषआरामात दंग होता. घरदार सारे मोडून, शेतीभाती खंडाने लावून मोठा मुलगा कलकत्त्याला जाऊन राहण्याची तयारी करीत होता. तो स्नेहमयी आली. "सुटणार हो, ते आज सुटणार आहेत. मी गाडी घेऊन जाते, तू चल, माझ्याबरोबर चला!" स्नेहमयी मुलाला म्हणाली.

"मा, मी येथे तयारी करून ठेवतो. आंथरुण घालून ठेवतो. आंघोळीला पाणी तापवून ठेवतो. तूच घेऊन ये बाबांना. माझ्यावर ते रागावतात!" मुलगा म्हणाला.

"त्यांचा राग! कसला रे तो राग? त्यांना का राग असतो तरी? बरे, तू येथेच राहा. सारी तयारी करून ठेव. येताच विश्रांती घेतील. आता भरपूर विश्रांती हवी. मी जाते." असे म्हणून स्नेहमयी निघाली. घरची गाडी घेतली. गाडीत गादी घातली. लोड ठेवला. "अरे गादी घालू नकोस. घेऊन ठेव. लोड घेऊन ठेव. ते त्यावर बसतील, पडतील. मी नाही त्या गादीवर बसणार. ती गुंडाळून बरोबर घे. ते भेटले म्हणजे त्यांचे डोके मांडीवर घेऊन मी बसेन गादीवर, गाडीत हो. गुंडाळ ती. मला तो झोऱ्या आंथर." स्नेहमयीने गाडीवानाला सांगितले.

गाडी वाऱ्याच्या वेगाने निघाली. दिगंबर रायांना घ्यावयास निघाली होती. गाडी तुरुंगाजवळ येत होती. सकाळचे आठ वाजले होते. दिगंबर राय

खोलीबाहेर पडले आहेत. वॉर्डर त्यांना दंडे मारीत आहेत. "साला कितना सोता है? उठता नही? क्या मरनेका ढोंग करता है!" असे म्हणून दंडे मारीत होता. मेलेल्या दिगंबर रायांनाही दंडे मिळत होते. धन्य तो देह– जो मृत होऊनही– शव होऊनही लोकांच्या क्रोधाला शांत करीत होता!"

"क्या सच ही मर तो नही गया?"

शिपाई आले. त्यांनी ओढला, फरफटत तो मंगल देह ओढला! काही नाही! "घाण का येते? मेला साला, हमको मोत के पीछे भी सताता है, सच्ची बात भी नही बोलता की भाई मैं मर गया!" असे म्हणून ते प्रेत ओढले. कोपऱ्यात पायाने ढकलले!

'तो तुरुंग! भेटतील दिसतील मला!' स्नेहमयी अधीर झाली. एकेक क्षण मोलाचा, तो क्षण युगाचा वाटे, लांब दीर्घ वाटे. तुरुंगाच्या भीषण दरवाजासमोर– त्या यम-नगरीच्या द्वारासमोर गाडी उभी राहिली. यमदूत आत एकदम जाऊ देत ना! तुरुंगावरील अधिकाऱ्यांना कळविण्यात आले की, कोणी बाई स्नेहमयी, पतीला मागण्यासाठी आली अहे. सत्यवानाचे प्राण परत मागण्यासाठी सावित्री यमधर्माकडे खऱ्याखुऱ्या यमधर्माकडे– गेली होती म्हणून प्राण मिळाले. खऱ्या यमापेक्षा हे यमाचे अवतार फार दुष्ट! त्यांच्या तावडीत गेलेले प्राण कसे परत मिळणार? एक वेळ मालक देईल, परंतु मधला कोठावळा किंवा हाताखालचा नोकरच हाती ठेवा पडू देत नाही. तोच ठेवा लांबवतो. स्नेहमयीचा प्राणठेवा– पतिठेवा कोणी लांबवला तर नाही ना?

जेलरला अद्याप हुकूम आला नव्हता. आजच्या टपालाने आला असता. त्याने स्नेहमयीला दुपारी या– अजून हुकूम आला नाही– दुपारच्या टपालाने येईल,– आला तर त्यांना सोडण्यात येईल–" असे कळवले. परंतु इतक्यात वॉर्डर व शिपाई "वो कैदी तो साब मर गया– बिलकुल. ठंडा– लकडीके माफक पडा है!" असे सांगत आले.

"तो प्रेत वो बाईको दे देव– बाहर खडी होगी– जलदी जाव!" जेलर म्हणाला.

स्नेहमयीला थांबा असे सांगण्यात आले. "आताच घेऊन जा– आम्ही आणतो." असे त्यांनी सांगितले. स्नेहमयी आनंदली, पुलकित झाली. डोळे आनंदाश्रूंनी चमकले. चर्या प्रफुल्लित झाली. गाडीत तिने गादी घातली. चार जणांनी दिगंबर रायांना धरून आणले. "अयाई, फार का हो आजारी आहेत– अयाई– मान टाकली हो– होतील, घरी बरे होतील,– आणा– मी माझ्या मांडीवर घेते." आशामयी स्नेहमयीला तो देह जणू अजून सजीव दिसत होता.

ती गाडीत बसली. पतीचे शिर तिने मांडीवर घेतले. "हाक गाडी, जलदी हाक!" गाडीवानाला ती म्हणाली.

शिपायांनी गाडीवानाला बाजूला बोलावून कानात सांगितले. एवढी माणुसकी अद्याप तिथे होती. काही हरकत नाही. आशा आहे, मग मानवी जीवनाची! अजून माणुसकीचा किरण चमकत होता तिथे.

गाडीवानाने गाडी हाकलली. स्नेहमयी माशा वारीत होती. ती तोंडाजवळ तोंड नेई. "नाही. बोलत नाही– मारले रे– हे पाहा दंडे– हे वळ मारले रे– मारले– आई अरे, पाहा रे, हे वळ– हे पहा रक्त फुटले आहे रे! अरे, सारे अंग ठेचले रे! कुसकरले रे, फूल– आई-आई राम– अरे, पाहा रे! आहे का रे जीव? आहे का रे? बोलतील का, बघतील का माझ्याकडे? बोला हो–अरेरे– मेलेले का दिले? कसे नेले आणि असे दिले! फुललेले नेले, कोमेजलेले दिले! हसणारे नेले– आणि रडणारे रडवणारे दिले. मिटलेल्या डोळ्यांचे दिले रे दैत्यांनी– बघ रे– पाहा रे– थांबव गाडी– पाहा."

"आई, शिपायांनी सांगितले की, ते सकाळीच देवाकडे गेले आई, रडू नका. घरी नेऊ. राखालच्या देहाला अग्नीही नाही. आई महाराजांचा देह तरी मिळाला, हीच पुण्याई. अग्निसंस्कार तरी होईल– आई!" गाडीवान समजूत घालीत होता.

"अयाई! हाल करून की रे मारले! नको रे, वैऱ्यावरही नको रे देवा असा प्रसंग!" स्नेहमयी रस्त्यातून विलाप करीत जात होती. रस्त्याकाठच्या शेतांतील शेतकरी कामं थांबवून पाहात. झाडावर पक्षी तो विलाप ऐकून गाणे थांबवीत. स्नेहमयी पतीकडे पाही. मध्येच हात धरून पाही. नाकाशी सूत धरून पाही! "हात गरम का लागला? हलले का सूत! छेः भास–" असे मनात येऊन पुन्हा विलाप करी.

आली- गाडी आली. दिगंबर राय सुटणार म्हणून सारा गाव तिथे लोटला होता. सुटले, खरेच सुटले! कायमचे सुटले!!! देहाच्या तुरुंगातूनही सुटले. स्वर्गात चढणाऱ्या दिगंबर रायांना निरोप देण्यासाठी जणू सारा गाव जमला होता. 'लोकांनी दिगंबर राय की जय' गर्जना केली. स्नेहमयी "गेले रे– मारले रे त्यांनी– आई!" असे म्हणत धाड्कन खाली पडली. पडली ती पडली! हा दिव्य सती जाण्याचा प्रकार इंग्रजांना बंद करता आला नाही! दिगंबर रायांना हाक मारून, त्यांना थांबवून स्नेहमयीने त्यांचा प्रेमळ स्वर्गीय हात हातात घेऊन प्रयाण केले! "जा, दिव्य आत्म्यांनो, परत स्वर्गीय राज्यात जा. राखालच्या कुटुंबाने ती पाहा पंचारती तुमच्यासाठी पाजळली आहे."

गावातील लोक स्वागतासाठी जमले होते. आनंदासाठी जमले होते. तो भयंकर प्रसंग समोर उभा! त्या गावाचे मायबाप तेथे मरून पडलेले! क्रूर परकी सरकारने त्यांचे मायबाप हिरावून घेतले. दिगंबर रायांचा तो शतचूर्ण देह पाहून लोक धाय मोकलून रडले. हजारो-लाखो शिव्याशाप त्यांनी मनोमन दिले. एक दिवस ते शाप समूर्त होतील आणि गुलामगिरीचा बळी घेतील.

लोकांनी मोठ्या भक्तिभावाने ते दोन देह पालखीत ठेवले. फुलांनी सारी पालखी आच्छादून गेली. स्नेहमयीला नवीन चुडे भरण्यात आले. ललाटी कुंकू माखण्यात आले. हरिनामाचा गजर करीत प्रेतयात्रा गेली. ते दोन पुण्यमय देह अग्नीच्या स्वाधीन करण्यात आले. "ने,– अग्ने, जातवेदा अग्ने, या आत्म्यांना अमर वैभवाकडे घेऊन जा. अग्ने नय राये सुपथा– ने अग्ने ने!"

❖

साने गुरुजींचे निवडक वाङ्मय

कुमार गटासाठी

१. सुंदर पत्रे (भाग १ ते ३)
२. बापूजींच्या गोड गोष्टी (भाग १ ते ६)
३. माझी दैवते
४. कुमारांपुढील कार्य
५. दिगंबर राय
६. जीवनाचे शिल्पकार
७. भारतीय नारी
८. लोकमान्य टिळक
९. आपले नेहरू
१०. भगवान श्रीकृष्ण
११. कावळे
१२. मोरी गाय
१३. साक्षरतेच्या कथा
१४. दारुबंदीच्या कथा
१५. श्रीशिवराय
१६. सोनसाखळी
१७. शबरी
१८. सुंदर कथा
१९. मुलांसाठी फुले
२०. यज्ञ
२१. त्यागातील वैभव
२२. गोड गोष्टी भाग १ ते १० (संच)
२३. श्यामची आई
२४. चंद्रभागेच्या वाळवंटी
२५. मेघ चियांग / इतर गोष्टी
२६. विचारगाथा
२७. विश्वदर्शन
२८. विश्वभारती
२९. हिमालयातील शिखरे
३०. आव्हाने
३१. अमोल गोष्टी
३२. विश्राम
३३. गोप्या
३४. मिरी
३५. दुर्दैवी
३६. आपण सारे भाऊ
३७. स्वर्गीय ठेवा

मोठ्या गटासाठी

१. नवा प्रयोग
२. सती
३. क्रांती
४. तीन मुले
५. समाजधर्म
६. राष्ट्रीय हिंदुधर्म
७. स्त्री-जीवन
८. रामाचा शेला
९. भारतीय संस्कृती
१०. भारताचा शोध
११. नवजीवन
१२. स्वप्न आणि सत्य

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०. फोन : ४४५१७२४